म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १३८८

# मृगजळ

इंदिरा



REFBK-0009409
REFBK-0009409

# मृगजळ

२३०७७ ३।०५-
१३१६ २८।३।५८

# मृगजळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

इंदिरा संत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ...
REFBK-0009409
REFBK-0009409

मौज प्रकाशन-गृह

किंमत अडीच रुपये

**मौज प्रकाशन : २९**

पहिली आवृत्ति : २२ डिसेंबर १९५७
सर्व हक्क कवयित्रीच्या स्वाधीन

वेष्टनावरील चित्र
**सौ. पद्मा सहस्रबुद्धे**

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
**वा. पु. भागवत**
मौज प्रकाशन-गृह,
खटाववाडी, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................. विः ..................
क्रमांक .................. नोंः दिः ..................

# अनुक्रम

१ थेंबाथेंबी १
२ आला कुण्या देशाहून २
३ भरांत...नकळत ३
४ नभांत उरलें ४
५ "ऐक जरा ना..." ५
६ मींच बुडविलें ८
७ चंद्रकळा ९
८ सोबत १०
९ फांस ११
१० दुःख १३
११ तुरे १४
१२ काय बाई सांगूं कथा १५
१३ बाकी १६
१४ सुख १७
१५ "किती छान तूं..." १८
१६ प्रश्न झाला २०
१७ उंबरठ्याशीं २१
१८ कळून चुकली २२
१९ कळतें त्याला २४
२० डोळ्यांच्या काळ्या डोहावर २६
२१ किती लुटावें डोळ्यांनीं २७
२२ ठाउक तुजला २८
२३ निळा पारवा २९
२४ नाहींस तूं ३१
२५ चांदण्यांतला एकच तुकडा ३२
२६ किती दिवस मी ३४
२७ ऊन एकटें ३५
२८ मृगजळ ३७
२९ काहुर ३९
३० क्षितिजावांचुन ४१
३१ तरंग ४२
३२ काळ्याकुंद भिंतीआड ४४
३३ काचाकवड्या ४५
३४ शिक्षा ४६
३५ परकी ४७
३६ मंत्राक्षर ४९
३७ स्वागत ५०
३८ पान अळूचें ५२
३९ पाय तुझे पायरीस लागले ५३
४० उपसावें...उपसावें ५४
४१ निघतें जेव्हां ५५
४२ वेदना ५६

४३ रेशिमकांकण ५७
४४ कदंबिनी ५८
४५ इथें वेदना ५९
४६ ओंजळ ६०
४७ काळोखाचें निघतें पाउल ६१
४८ स्वप्न तुझें ६३
४९ डोळां रेखलें काजळ ६५
५० उरली केवळ ६६
५१ वर्षा ६७
५२ मनोरा ६८
५३ पदर उन्हाचा ७०
५४ आज ७२
५५ उभें मात्र थेंब रक्त ७३
५६ नटरंगी ७४
५७ समोर उरतें ७५
५८ कणव ७६
५९ उदाच्या बनांत ७७
६० तूं ८०
६१ भिल्लीण ८१
६२ पावसाची रात्र ८२
६३ आलें होतें सांगायाला ८३
६४ अजंठा ८४
६५ अशा भलत्या वेळीं ८६
६६ एक वेड ८७
६७ बाधा जडली आभाळाला ८९
६८ पारावरतीं ९०

## थेंबाथेंबी

दा. क्र. ६४०९

तारेवरतीं असती थांबुन
थेंब दंवाचे;
मनांत ज्यांच्या,
इवलें कांहीं, हिरवें-पिवळें
चमचमणारें...

सतारीवरी असती थांबुन
थेंब सुराचे;
मनांत ज्यांच्या,
इवलें कांहीं, निळें-जांभळें
झनझनणारें...

मनोमनावर असती थांबुन
थेंब विजेचे;
छेडुन तारा करांगुलीनें,
ओठ करावे पुढतीं
टिपायला ती थेंबाथेंबी.

## आला कुण्या देशाहून

आला कुण्या देशाहून
काळ्या पांखरांचा थवा;
विसावला तारेवर;
निळें पाणी निळी हवा.

टेहळणी तिरकस;
पंखूट हो खालींवर;
बाळमिठींत बोंचऱ्या
तार करी थरथर.

तळें करून डोळ्यांचें
खालीं माळ पाही वाट;
जरीबुंद शेल्याखालीं
कणी बींचें सोनताट

## भरांत... नकळत

भरांत... नकळत
असह्य दुर्दम दुःख ठिबकलें
ओठावरतीं.

तप्त निखाऱ्यावर विझतांना
तडफडणाऱ्या
त्या दुःखानें, मला शापिलें.

तेव्हांपासुन
सदा सारखी हसतें... हसतें
दुःखवेगळी.

## नभांत उरलें...

जळराशीची ओढ अनावर
हवीच जर का तुला कळाया,
हवेंच व्हाया तुजला वाळू
कणाकणानें...तसें झिजाया.

—पुण्य न तितुकें असतें गांठीं
शापायाला तुला तसें पण;
ओघ गोठला जळराशींतिल
नभांत उरलें फक्त निळेंपण!

## "ऐक जरा ना..."

अंधारानें कडें घातलें
घराभोंवतीं;
जळधारांनीं झडप घातली
कौलारावर.
एकाकीपण आलें पसरत
दिशादिशांतुन.

घेरायास्तव...

एकटीच मी
पडतें निपचित मिटून डोळे.

हळूच येतें दार घराचें
अंधारांतुन;
उभें राहतें जरा बाजुला.

"ऐक जरा ना...
आठवते मज ती...टकटक
त्या बोटांची;
शहारते अन् रंगरोगणाखालीं
एक आठवण,
गतजन्मींची;

आभाळांतून टपटपणाऱ्या
त्या थेंबांची."

"ऐक जरा ना..."
दंडावरतीं हात ठेवुनी
कुजबुज करते अरामखुर्ची.

"आठवते का अजुन तुला ती
कातरवेळा.
माहित नव्हतें तुजला,
वाट तुझी तो पाहत होता
मिटून डोळे.
होतें दाटुन असह्य ओझें;
होती धुमसत विद्युत् काळी;
अजून होते मजला जाणिव
निबिड वनांतिल...
मध्यरात्रिच्या वावटळीची
—झपाटल्याची."

"ऐक जरा ना..."
कौलारांतुन थेंब ठिबकला
ओठावरतीं.

"ऐक जरा ना...एक आठवण.
ज्येष्ठामधल्या—त्या रात्रीच्या

पहिल्या प्रहरीं,
अनपेक्षितसें
तया कोंडलें जळधारांनीं
तुझ्याचपाशीं.
उठला जेव्हां बंद कराया
उघडी खिडकी,
कसें म्हणाला...
मींच ऐकले शब्द तयाचे...
'या डोळ्यांची करील चोरी
वीज चोरटी
हेंच मला भय.'"

—धडपडलें मी, उठलें तेथुन;
सुटलें धावत
त्या वस्तूंतुन, त्या पाण्यांतुन,
दिशादिशांतुन,
हात ठेवुनी कानांवरतीं;
ऐकुं न यावे शब्द कुणाचे,
कुणाकुणाचे:
"ऐक जरा ना..."
"ऐक जरा ना..."
"ऐक जरा ना..."

## मींच बुडविलें

ऐकुन घेणारा . . . तूं.
समजुन घेणारा . . . तूं.

तुझ्याचपाशीं म्हणुन वागलें,
म्हणुन बोललें. . .उगाच कांहीं
खुळेंभाबडें,
भानमोकळें . . .
अर्थशून्यही.

मुरडुन थोडें नाक बुद्धिचें,
हासुन थोडें उपहासाचें,
म्हणालास तूं . . .
"सांगशील का मोजुन मजला
ह्या उथळपणाची खोली?"

गळ्यांत आला एक अवंढा
—डोहच काळा उथळपणाचा—
भिडलें काळें पाणी येउन
काजळावरी . . .

आणि तुला मीं,
मींच बुडविलें त्या डोहामधिं
उंच तुझ्या त्या
हिमशिखरांसह.

## चंद्रकळा

पुरवाया वेडी हौस
      साडी घेतली विणून
उभें-आडवें जिच्यांत
      काळ्या रात्रीचें रेशीम ;

मधें नाजूक कशीदा
      स्वप्नपांढऱ्या जुईचा,
किनारीचा नवा ढंग
      चित्रामंगळस्वातीचा ;

पुरवाया वेडी हौस
      साडी घेतली विणून ;
—तुला सामोरें येतांना
      घडी मोडावी म्हणून.

## सोबत

खुरटीं झुडुपें दंग स्वतांशीं;
खडक पाहतो मज टवकारुन;
मातीला नच पटली ओळख.
"कोण इथें तूं?" —टोंचतसे तण;
हवा पुटपुटे, "खरी अगंतुक";
ओळखिला नच कर ये कोठुन.

धीट जरी मी उभी राहतें,
असह्य झालें तें परकेंपण.

दिसे अचानक एका जागीं,
गवत न जेथें, नुसती माती;
दहा खळगुल्या... समांतरावर;
एकीमध्यें होत्या गाई
—खडे मूठभर;
विस्कटलेली इवली चुंबळ;
पांच आठळा,
फणसामधल्या.

भरून आले डोळे... पाहुन
ओळख ती... ओळख जन्माहुन.

हात फिरविला त्या सर्वांवर;
बसलें सोबत मीच तयांना.
            निघतांना अन्
ठेवुन आलें त्यांच्यापाशीं
रुमाल इवला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23088 वि:
क्रमांक नों: दि:

## फांस

त्या एका...आठवणीचा
फांस गळ्याशीं हसतो आहे.

अजुनि कशी ना होते बुरखा
काळी जाणिव;
अजुन कसें ना निसटुन जातें
पायतळीचें
फळकुट खोटें;
अजुन कुणी का वाट पाहते
तशा क्षणाची;
सुटेल ज्यानें फांस अचानक
फिरेल आणिक वलय भोंवतीं
झगमगणारें
कलाबतूचें.

## दुःख

उभें दुःख हें...उभें पुढ्यांतच;
स्तब्ध, स्वयंभू,
पहाडापरी.

कडवट काळा प्रकाश त्याचा
काळवंडवी नसा मनाच्या;
जडभारी अन् स्पर्श तयाचा
त्या मातीहुन...थंड भयानक;
थिजवी डोळ्यांमधलें पाणी;
अलिप्तता अन् अशी तयाची
—जाळीना मज.
तसेंच ठेवी...तटस्थ, निश्चल,
आणि रिकामें.

जीव भयानें जातो पिंजुन;
उभी राहतें तिथेंच मी पण
निरखित त्याला.
उचलूं बघतें पुढेंच पाउल.

—कारण येतो वास तयाला
तान्ह्या ओठावरुनी
ओघळणाऱ्या गोड दुधाचा.

## तुरे

उधळलेंस तूं...
उधळलेंस जें कणाक्षणावर...
अजून नाहीं—स्मरणामध्यें,
स्वप्नामध्यें,
—शब्दामध्यें,
अजून नाहीं...रक्तवेगळें.

असेंच अद्भुत
उधळलेंस जें...जें माझ्यावर...
मुजोर फुटले तुरे जिवाला
गेले भेदुन दगडी अंबर.

# काय बाई सांगूं कथा

"काय बाई सांगूं कथा,
क्षण विसावा भेटतो;
गुल्बाशीच्या फुलासंगें
पुन्हां दीस उगवतो.

काय बाई सांगूं कथा..."
पाणी आणून डोळ्यांत
एवढेंच बोलली ती
घागरीला हात देत.

## बाकी

होतें का तें नुसतें
येणें आणिक जाणें ;
होत्या का त्या नुसत्या गप्पा,
क्षेमकुशल अन् स्मरणें ;
होतें का तें नुसतें फिरणें—
करड्या चढणीवरुनी
हिरवी उतरण घेणें ;
होतें का तें नुसतें बघणें
क्षितिजावरची चित्रलिपी अन्
पायाखालिल गवतावरचीं
तुसें रेशमी...

निवांत वेळीं
आभाळाच्या पाटीवरतीं
हिशेब मांडुन बघतां
उरते बाकी.
चंद्र घेतला जरी हातचा,
तरीहि उरते बाकी.

## सुख

असें तसें माझें सुख
पाखडाव्यात चांदण्या;
कणीसाठीं उतराव्या
कल्पतरूच्या चिमण्या.

असें तसें माझें सुख
घरकुलींत मावेना;
उतू जातें भसाभसा,
मन परी कां विझेना

# "किती छान तूं...."

येत मनावर
अवघड ओझें काळोखापरि...

घुसमटलें अन्
ताठताणल्या रक्तवाहिन्या;
शब्द कोंडले ओठावरचे;
डोळ्यावर ये विखार काळा.

भिंती झाल्या ढीग वाळुचे
ढासळणारे...
पलंग झाला भुंडा डोंगर;
घेई गिरक्या हवा तापली
खाणीमधली...
त्या वलयांतुन
दिसला
मेजावरच्या दिव्यापलिकडे
तुझा चेहरा
गडद दाटला.
डोळे ताठर भरुन पापण्या
लगबग होते पसरित माती
मनोमनाच्या
उत्खननांतिल अवशेषांवर...

आणि अचानक
काळोखाची फुटली कवची.

उठलें भर्रकन.
दाखविला तुज, खिडकीमधला
माड काजळी ;
कपाटांतल्या पुस्तकांतल्या
आणि वाचल्या... कांहीं ओळी ;
खळखळलें अन् ऊन तयांवर
निरभ्र साधें...
किरणांतुन त्या दिसला
मेजावरच्या दिव्यापलिकडे
तुझा चेहरा... उजळमोकळा.
नजर मुक्तशी होती उधळत
"किती छान तूं..."

## प्रश्न झाला

प्रश्न झाला ... एकच ओंजळ
अवकाशाची,
झेलायास्तव एकच उत्तर.

प्रश्न झाला ... निळा, निळा
खुलवायास्तव
उत्तरांतल्या उषा नि संध्या,
चंद्रचांदण्या.

प्रश्न झाला ... काळा, काळा
सोसायास्तव
उत्तरांतले गहन तुफानी
गिरिवर, सागर,
अथांग छाया.

प्रश्न झाला ... लालजांभळा
उत्तरांतली एकच ज्वाला
संथ-कांपरी
जळावयास्तव.

## उंबरठ्याशीं

उभें राहुनी उंबरठ्याशीं
निरोप द्यावा क्षितिजापाशीं;
सुकलेल्या अश्रूंत धराव्या
कभिन्नशा मेघांच्या राशी.

उभें राहुनी उंबरठ्याशीं
निरोप द्यावा क्षितिजापाशीं.
ओठावरल्या निःशब्दाचा
पहाड दाटुन उभा असावा
अथांग झेलित
उंबरठ्याची मृगजळराशी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४०९
(प्रथम प्रत)

## कळून चुकली

कळून चुकली
अंधाराच्या बाळकडूची
अफाट शक्ति तो सरल्यावर.

पिऊन त्याचें काळें पाणी
वावरतांना
नव्हती परवा
पायाखालिल कांटेऱ्याची ;
जाणवली नच ठेंच कधींही ;
रक्तहि नाहीं दिसलें ;
कधीं न केली फिकीर, पडतें
पाउल पुढचें कोठें ;
जमीन तुटतां
देह झोकला उंच कड्याहुन.

कृतघ्न मी पण
ध्यास उराशीं धरला,
त्या तेजाचा.
प्रकाशांतलें
पहिलें पाउल तिथेंच खिळतें
फटकपांढरें... भित्रें... दुबळें.

होते जाणिव
पायाखालिल कांटेऱ्याची;
कळतो आहे
पुढ्यांत खंदक, तळास ज्याच्या
भयाण पाणी.

## कळतें त्याला

डोळ्यामधुनी फिरलें जेव्हां
हिरवें काजळ
तेव्हांपासुन....
तिथेंच त्याला बघतें
पिवळ्या माळावरतीं.

मिटून डोळे
चोरुन अवघ्या शक्ति
कासवापरी, पडून आहे
काळा...अगदीं काळा
फत्तर.

—कळतें पण त्याला
सगळें, सगळें कळतें.

कधीं भिववितो बाळतणाला
घेउन माथ्यावरतीं;
कधीं दुपारीं स्वप्नीं रमतो
चघळत लाल डहाळी;
जपुन ठेवतो आपुलकीनें
भाकर गोवाऱ्याची;
कोकरावरी करतो माया.

कधीं तरी मी
जातां त्याच्यापाशीं
उरांत घेउन संकट,
कळतें त्याला
सगळें...सगळें कळतें.

## डोळ्यांच्या काळ्या डोहावर

डोळ्यांच्या काळ्या डोहावर
थरथरलें नव्हतें पाणी;
ओठहि नव्हता हलला.

मागितलें मीं नव्हतें कांहीं
—मागणारही नव्हतें;
क्षितिजावरचें
झुळझुळणारें वेडें मृगजळ
मजला झुलवित नव्हतें.
दिलास तूं पण
आभाळाचा शाप भयंकर,
या क्षितिजाहुन...त्या क्षितिजावर
ज्याच्यामध्यें
तुफान नुसतें गदगदणारें.

## किती लुटावें डोळ्यांनीं

किती लुटावें डोळ्यांनीं
दिवसाचें निर्लेपण ;
काच रंगेना मनाची,
उमटेना निळी धून ;

किती खोल घ्यावे श्वास
पिण्या काळोखाचें वीष ;
रिते जरी लाख डोह
नाहीं जहराचा होष ;

नाहीं बांसरीची धून,
नाहीं कशी वीषबाधा ;
अशी कशी ही पापीण...
हसे मीरा, हसे राधा.

## ठाउक तुजला

ठाउक तुजला
अपुल्यामधलें अंतर.
एकापुढतीं एक असे हे
अपुल्यामध्यें
अनेक मृगजळसागर...

आणि तरीही
तुझें खुणेचें शुभ्र कबूतर
तरंगतें कां निळ्या अभाळीं?
कशास त्याच्या पायीं घुंगुर;
कशास त्याच्या टोचीमध्यें
अंगठींतला मोती?

कधीं न त्याला दिसायचा पण
स्वप्नकिनारा
आणि किनाऱ्यावरची मीही.
वाट पाहतां
अंगावरतीं चढली माती
ये धरणीपण...
शीळ घालण्या उधाणलेल्या
मनास माझ्या
त्या मातीचें आतां बंधन.

## निळा पारवा

वसुंधरेच्या माथ्यावरतीं
घुमतो आहे
आभाळाचा निळा पारवा.

डोळ्यावरतीं राखी ढापण,
लक्ष सदाचें धनिणीपाशीं
अन् धनिणीच्या पायामधल्या
रुणझुणणाऱ्या नादापाशीं.

—अवचित कांहीं घडलें...
आणि दचकला निळा पारवा;
टपोरल्या डोळ्यांच्या गुंजा.

जाती त्याच्या अगदीं जवळुन
किलबिलणारे कुणी मुशाफिर
रंगित पक्षी...
कुणीं घासली चोंच तयावर;
कुणीं घातली शीळ तयाला;.
ऐकविली...पंखांची फडफड;
दाखविलें चित्रांकित वैभव
पंखांवरचें.

गिरकी घालुन त्याच्या भंवतीं
निघून गेले...धुंद मुशाफिर;
झुलवित अपुलीं पंखें,
झुलवित त्याला.

पुन्हां दचकला निळा पारवा,
मनांत भरलें वारें—
पिसापिसांतुन थरथरणारें;
फुगलीं पंखें;
उचलुन धरला पोटापाशीं
पाय एकुटा;
मान ताठली, जरा खालतीं
झेप भराया...

तोंच वरी ये वसुंधरेचा
तांबुसगोरा कोमलसा कर.
भरवी त्याच्या टोचीमध्यें
एकच मोती
शुभ्र टपोरा,
एकच माणिक, झगमगणारें.

पुन्हां टेकलें पाउल खालीं;
नितळाई ये पुन्हां पिसांवर.
—आणि लागला पुन्हां घुमाया
आभाळाचा...निळा पारवा.

## नाहींस तूं

नाहींस तूं... नाहींस तूं.

'नाहींस तूं'नें भरलें अंबर,
भरले तारे,
भरली धरणी, भरले वारे.

'नाहींस तूं'चा प्रचंड पुतळा
उभा राहिला पुढ्यांत माझ्या.

मेघ जाहले केसमनस्वी;
कुरुंद झाल्या तुझ्या बुटाच्या
कणखर टांचा.

विसरुन गेलें क्षणभर तुजला
आणि लोभला
जीव बुटाच्या कंगोऱ्यावर,
त्या मेघांवर...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23088 वि: काव्य
क्रमांक 9388 नों: दि: 24/3/42

## चांदण्यांतला एकच तुकडा

अर्ध्या रात्रीवरुन उतरते
जाग उगीचच पापणीवरी.
काळोखांतच, नजर ओढते
काळ्या रेषा...

अडवी तिजला
कौलावरतीं झिमझिमणाऱ्या
चांदण्यांतला एकच तुकडा.

कधीं कधीं तो दिसतो
उजव्या बाजुस भिंतीवरतीं
जरा आडवा;
हाताचा मग खेळ चालतो
गुंफुन बोटें
—चित्रबांधणी तऱ्हेतऱ्हेची:
हरिण उभारी शिंगें उत्सुक;
कान सशाचे;
नाग डुलावा फणा उभारुन.

चढतो कधिं तो होउन तिरपा
दोरीवरच्या वस्त्रावरतीं;

अन् वाऱ्यानें, हलकेहलके
झुळझुळतांना वस्त्र रेशमी
थरथरतो तो
निळ्या केशरी तलावांतल्या
शुभ्र परीसम.

कधीं तरी पण
सरळ अचानक येउन पडतो
ओठावरतीं.
क्षणांत होते राख तयाची.
दिवसाकांठीं वावरतांना
कितीकदां मग कडू लागते
ओठाची चव.

## किती दिवस मी

किती दिवस मी मानित होतें
ह्या दगडापरि व्हावें जीवन;
पडो ऊन वा पाउस त्यावर
थिजलेलें अवघें संवेदन...

खिळवुन ज्याच्यावरतीं डोळे
मनांत यावें असलें कांहीं
तोच एकदां हसुन म्हणाला—
दगडालाही चुकलें नाहीं.

चुकलें नाहीं... चढतें त्यावर
शेवाळाचें जुलमी गोंदण;
चुकलें नाहीं... केविलवाणें
दगडफुलाचें त्यास प्रसाधन...

थिजलेल्याचें असलें कांहीं
त्याहुन वाटे, हवें तुझें मन
सळसळणारें अन् जळणारें
पशापशानें जाया भडकुन.

# ऊन एकटें

शुभ्र ढगांचा रंग फासुनी
दाखवितें आकाश वाकुल्या;
वात्रट मोठें,
उगाच फिरतें शुद्ध नागडें;

हिरवट वारा
झगा घालुनी खाजकुयलिचा
ढुसण्या देतो दिसेल त्याला;

हवा धुक्याच्या बुरख्याखालुन
काढी चरबट बोटें
चिमटे घ्याया येइल त्याला;

अळीमिळीनें, मुकेंच होउन
पाणी नकळत घेतें चावा,
सर्पविषारी, मिळेल त्याचा;

तिरसट झाडें
पिवळ्याकाळ्या घालुन चिंध्या
उभीं राहती पसरुन झिपऱ्या
भुतासारखीं.

ऊन एकटें
सालस मोठें
बाळ गोमटें . . .

निरलस फिरतें
शेळ्यांमागुन, काळ्याढवळ्या,
चढणीवरतीं ;
तत्पर बसतें
छपरावरच्या वेलापाशीं
लाल भोपळ्यासाठीं राखण ;
प्रेमळ फिरवी हात मजेनें,
उंबरठ्याशीं,
दुपट्यावरच्या बाळावरुनी ;
आज्ञाधारक,
पाठ खाजवी
वाळवणाशीं . . . बसलेल्या
आजीची ;
नटरंगी अन्
उंच उंच किति मुरकत जातें
लालचुटुकसा पतंग होउन.

## मृगजळ

दारापाशीं उभी तुझ्या मी.
बंद दार तरि, अधीर पाउल
निसटूं बघतें
चपलांच्या बंधांतुन;

क्षण थरथरतें
बोट विजेच्या बटणावरतीं...
गजबज उठती
लालविजेचीं नादपांखरें
अंगांगांतुन.

असह्य होउन
हात टेकतें चौकटीवरी;
श्वास ऐकतो आंतिल चाहुल;
खिळती डोळे
दरवाजावर;
दाराआंतिल...त्या डोळ्यांवर.
आणिक होतो दरवाजाच्या
बंद फळ्यांचा
मोरपिसारा
थयथयणारा...झगमगणारा.

दिपले डोळे मिटती क्षणभर.

आणि इथें मी.

त्या दारांतुन,
वाट संपली जेथें तेथुन
अनोळखीशा अशा ठिकाणीं—
फुटती जेथुन असंख्य वाटा
फिरती जेथें असंख्य डोळे
अशा ठिकाणीं
काचेच्या बरणींत उन्हाच्या.

तडफडतें मन, उलटेंसुलटें
इथें कशी मी... इथें कशी मी.

हिरमुसवाणीं
निमूट बसलीं दोन मुसंबीं
नजर लावुनी
झाकळलेल्या ग्लासावरतीं ;

आणिक तोही, शून्यरिकामा,
टकमक बघतो जाणुन घ्याया
हिरव्या औषधकुपिचें अंतर ;

उभी स्तब्ध ती. चूर स्वतांशीं,
धरुन उरीं काहूर तांबडें ;

उभा डोस अन् फटकपांढरा
बघुन आडव्या तापनळीला
—चढवुन पारा चारावर जी
तशीच उघडी
भीतीनें बेभान होउनी
घट्ट बिलगली, सुन्न घड्याळा ;

शांतवि तें तिज, जवळ घेउनी,
फिरवुनि कांटे ;
चुकचुकते परि पाल
मनांतहि त्याच्या ;

भेदरलेलें...बावरलेलें...
काहुर सारें
छातीवरतीं धरुन कसें तरि
उभें तिष्ठतें मेज एकटें
...एकएकटें
विषण्णशा त्या मुक्या प्रकाशीं

जरी धिराचें,
सळसळला जरि पडदा किंचित्
सोबतीस तें वेडें होतें;
जरी धिराचें,
करकरला जरि पलंग किंचित्
भीतीनें तें उभें गोठतें.

## क्षितिजावांचुन

नाकापाशीं घमघमतो क्षण
विस्मरणाचा ईथर.

मिटती डोळे;
आणि पापणीवरुन निखळती
किती आठवणि...

कडू मद्यानें भिजली टपटप
काळोखाची माती.
त्या बुक्क्यामधिं
क्षण वळवळली पांच फड्यांची
काळी नागिण
मिटतां मिटतां फडा मनस्वी.

मिटलें सारें.
उरलेल्या अन् भगदाडावर
स्वच्छ निळें मन...क्षितिजावांचुन.

## तरंग

मी कधींच मिटून गेलें आहें
रात्रीच्या कृष्णकमळांत...

हा जो वर दिसतो आहे,
तो आहे
मिटतां मिटतां माझ्या
डोळ्यांतून ओघळलेला
चंद्राचा थेंब;
ज्याच्यावर उमटले आहेत
तुझे आभाळलेले डोळे.

मी कधींच जळून गेलें आहें
दिवसाच्या पांढऱ्या वणव्यांत.

हें जें वर दिसतें आहे,
तें आहे
माझ्या हातांतील सोनकांकण;
ज्याच्यावर चढली आहे
तुझ्या हाताची
धगधगणारी झिलई.

मी कधींच बुडून गेलें आहें
'नाहीं'च्या महासागरांत.

हा जो वर दिसतो आहे,
तो आहे
माझ्या चंद्रकळेचा पदर :
ज्याच्यावर उमटले आहेत
तुझ्या हातच्या चुण्यांचे
काळे तरंग.

# काळ्याकुंद भिंतीआड

काळ्याकुंद भिंतीआड
कुणी आक्रंदते वेडी;
देते धडक चिऱ्याला—
"कां ही अंधारकोठडी?"
"कां ही अंधारकोठडी?"

रक्तमाखल्या शब्दाचा
लाल घुमतो आवाज;
काळोखाच्या चिऱ्याचेंही
जातें हलून काळीज—
"बाई कशी चोरलीस
त्याच्या डोळ्यांतली वीज?"

कोठडीच्या सभोंवतीं
कुणी फिरते एकटी,
तुडवीत डोळ्यांतील
वाळवंट अटीतटी;
पायतळींच्या वाळूचा
कण चिऱ्याच्या डोळ्यांत;
भिजलेली आग बोले—
"कां ग आतां खंत खंत?"

## का चा क व ड्या

पाखडती दाही दिशा
आग...आगीचा कल्लोळ;
घुसमटल्या धुराचें
वर दाटलें आभाळ;
ऊन राखेच्या थराचा
धरे राखाडीचा माळ.

मीहि झालें थोडी ज्वाला;
झालें थोडीशी आभाळ;
थोडीशीच झालें राख:
उरलेंही दशांगुळ.

ज्वाला खोविल्या केसांत;
ल्यालें तलम आभाळ;
राखेवरतीं मांडला
काचाकवड्यांचा खेळ.

डाव्याउजव्या हाताचें
दान मिटतां मिटेना;
डाव तरेना बुडेना;
खेळ संपतां संपेना;
—उरलेल्या माझा मला
थांग कसा तो लागेना.

## शिक्षा

डोळ्यामधलें लाल धुकें तें
ती अगतिकता;
कपाळावरी आक्रसलेली
कुंद वेदना;
निर्वाणीचे...शब्दहि ओठावरचे;
पायामधल्या
लोखंडाच्या बेड्या;
खांद्यावरचें कलिकाळाचें ओझें.

दिसलें मजला
निरोप घेतांनाचें...दारुण.
क्षणैक थिजलें रक्त नसांतिल
आणि उमगलें माझें
अपराधीपण;
शिक्षा एकच ज्याला
तिथें त्या क्षणीं, हवेंच घ्याया
आठवणीच्या फासावरतीं
टांगुन.

## परकी

दमलें चालुन
आणि परतलें घराकडे मी...

अजून होतें पायावरतीं
ढगाढगांतिल धुकें पिंजलें;
अजून होते केसांमध्यें
निळ्या विजेचे केसर उरले;
अजून होत्या डोळ्यांमध्यें
ओल्या तारा...

भरली रक्तामध्यें ऊब घराची
येतां दारापाशीं.
समोर तें पण
शून्यरिकामें...अनोळखीसें.

आली आंतुन कोणी:
सावरलेले ओचे,
हातामध्यें कसलें भांडें,
डबडबलेला घाम कपाळीं,
ओठावरचे शब्द पोरके,
थोडे परके,
"कोण तुम्ही?"

—मला कळेना.

आली दुसरी तिच्याच मागुन :
हातामध्यें कसले कागद,
डोळ्याखालीं शिणवट काळा,
ओठावरतीं शब्द कोरडे,
थोडे करडे,
"कोण तुम्ही ?"

—मला कळेना.

क्षणभर दोघी उभ्या राहिल्या
दारापाशीं ;
आणिक तेंही बघतें टकमक
अनोळखीसें...

—मला कळेना.

## मंत्राक्षर

अशी तशी बदलतें
        कूस सारखी सारखी ;
आज कशानेंशी झाली
        नीज मजला पारखी.

पडे पलंगाभोंवतीं
        काळ्या रात्रीचा पहारा ;
जरा उघडतां डोळे
        देते भुताचा इशारा.

लपेटल्या चादरीची
        एक दशीही हलेना ;
डोळ्यावरून पापणी
        उचलतां उचलेना ;
चिंब भिजल्या मुठीचें
        बर्फ सुटतां सुटेना.

कण . . . कण . . . झाले कान
        कान ऐकाया अधीर
पहाटेच्या चोचींतून
        फुटणारें मंत्राक्षर.

## स्वागत

वेडे डोळे
बसलें होतें लावुन,
तुझ्या घराच्या वाटेवरतीं
दूर निघे जी
दूर...दूरवर,
नजरेच्याही झेपेपुढतीं.

बघतां बघतां
धुकें दाटलें काजळकोरीपाशीं.

येत समोरुन, दुडदुड धावत
वाट हासरी माळावरली :
लाल मातिची तजेल चुनडी,
केसांमध्यें घोस फुलांचे.

तिच्या मागुनी येते
जपून चालत,
दचकत बिचकत,
रुखे केस अन् फिकेंच पातळ
रहस्यमयि कीं कुणि संन्यासिनि
पहाडांतली वाट...एकटी.

येते तिसरी झपझप चालत;
चाल तिची तर धीट नागरी,
अंगावरतीं काळें रेशिम,
चंचल विभ्रम,
लावणींतली तान टिपेची.

तुझ्याच या तर दूती!

मन खुलभुललें, पुढें निघालें;
पाय पायरीवरुन उचलला;
वळवळली अन् पायाखालीं
पिवळी नागिण...
दूर निघे जी...दूर दूरवर.

बघते तेथुन
मागें मुरडुन
धरुन फणी वर;
तुझेंच तें घर:
हिरव्या भिंती, उघड्या खिडक्या;
दारापाशीं उभेंच स्वागत
—हात पुढें अन् डोळे हासत...

e४०२

## पान अळूचें

जातां जातां चुकुन कधीं तरि
जरा चढावी टांचावरतीं
दुर्वांमधली गार तुषारी...

चुकुन कधीं तरि
आभाळाशीं होतां सन्मुख
गारगारसें मंज ढळावें
मिटलेल्या ओठांडोळ्यांवर...

आणिक मी तर पान अळूचें
लेतें अंगांगावर
चुकुनकधींच्या मण्यामण्यांचा
हिरवा पारा.
मुळिं न हालतें,
डुलतें...वाऱ्यानेंही.
उभी राहतें नितळस्तब्धशी.

## पाय तुझे पायरीस लागले

पाय तुझे पायरीस लागले
आणिक हसलें दालन...दालन ;
तुझें आगमन
वार्ता त्याची गेली पसरत
वाऱ्याच्या चोंचींत होउनी
शीळ गोडशी.

सोनतुरा तर हर्षभरानें
घेउं लागला
पिवळे तोडे.

लाटांचा आनंद दाटला
कांठावरतीं
निळ्या तळ्याच्या.

अभाळ लवलें खालीं
आणि चांदण्या
उतरुन आल्या कौलारावर.

किती उशीरां उठलें तरिही
उभ्याच होत्या
पागोळीशीं थांबुन.

## उपसावें ... उपसावें

उपसावें ... उपसावें
आंसूओल्या पापण्यांनीं
डोहांतील काळें पाणी.

डोहांतील काळें पाणी
उपसतां उपसेना;
तळ स्वप्नांचा लागेना.

तळ स्वप्नांचा लागेना,
तरी ध्यास मनापाशीं
उपसावें पाणी ... पाणी
भिडलेलें क्षितिजाशीं.

क्षितिजाशीं चंद्रबिंब
काळ्या पाण्याच्या धारेंत;
उंचावली लाट माझा
पाय ओढते पाण्यांत.

## निघतें जेव्हां

निघतें जेव्हां
तुझ्याकडे मी येण्यासाठीं ;
सूर्य टाकतो जळांत केशर,
रचतो सेतू... झुलता ;

दारापाशीं अडवुन मजला
दिशा गुंफती केसामध्यें
फुलें विजेचीं ;
रात्र नेसवी चंद्रकळा अन्
चंद्र घालतो नयनीं काजळ.
आणि पहाटे
उषासखी तर चतुर नेमकी
घेउन येते मेणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23044 विः काव्य
क्रमांक 9364 नोंः दिः 2-9-3-81

## वेदना

डोळ्यामधलें रक्त थिजावें
ओठहि व्हावे हिरवेकाळे
आणि गिळाव्या
लाख वेदना.

ज्या लाखांच्या अंगांगावर
फुटती
फडा उग्रशा, उफाडणाऱ्या
निवडुंगाच्या.

नुरतें तेव्हां
माझें... माझें... मीपण,
नुरती पुढले बेत आणखी
मागिल कांहीं आठवण,
नुरतें तेव्हां दुःखहि
सांगायाचें कण्हुन...

सहस्राक्ष त्या फणीफणीला
दिसतें एकच :
अंग चोरुनी आहे सरकत
वरतीं वरतीं
भयाकूल नभ.

## रेशिमकांकण

धरणीवरतीं जरी पाउलें
हात कवळती अथांग अंबर.
टिपून घेती सुकले ओठहि
नक्षत्रांचें . . . दहिंवर.

जरी इथें मी धरणीवरतीं
कळते मजला त्याची
                    जखम विजेची;
कळतें मजला त्याचें वादळ;
                    कळतें आहे
खुणेस त्याच्यापाशीं
                    माझें लांछन :
वाढवलेलें माझें रेशिमकांकण.

## कदंबिनी

झिमझिमलें डोळ्यांतुन
लाल चांदणें;
विस्मरले श्वसन पवन
संथ वाहणें;
शीत मुकें वाळवंट
स्पर्श जाहले;
स्मृतिचें गोकूळ दूर
धुकट लोपलें;
पिउन नाद स्तब्ध कशी
ज्ञानवाहिनी;
कांठावर मंत्रविद्ध
स्थिर कदंबिनी.

## इथें वेदना

इथें वेदना लालतांबडी;
इथें बधिरता संगमरवरी;
इथें उकळतें रक्त तापुनी,
बेहोषी अन् येथें काळी.

दुखणें बसलें चिंध्या फाडित.

गरगर फिरती त्याचे डोळे;
नसांनसांतुन
घुमतें त्याचें हास्य भयानक
उरल्यासुरल्या रक्तकणांतुन.

समोर त्याच्या
करते नर्तन...एक आठवण
त्या प्रलयाची.
तें कथ्थक...त्या मुद्रा...
अन् तें...खर्जामधलें कंपन.

## ओं ज ळ

भुकेजल्या आभाळाला
    द्यावी मूठभर कणी;
तहानेल्या सागराला
    द्यावें शिंपीभर पाणी.

द्यावें . . . द्यावें.

द्यावें लुटून जीवन
    हेंच माझें . . . माझें बळ;
एक तुझ्यापाशीं मात्र
    माझी जुळते ओंजळ.

एक एक भूक माझी
    तुझ्या मूक आवंढ्याची;
तहानही एक एक
    एका अश्रूच्या धुक्याची.

## काळोखाचें निघतें पाउल

दोन करांच्या घट्ट मिठीनें
धरुन ठेविलें
काळोखाचें निघतें पाउल.

वळून मागें थोडें
वाकुन खालीं
केसांमधुनी फिरवित बोटें
म्हटलें त्यानें
अल्लडवाणें... कपटदेखणें :

*"बेडकी, बेडकी, माझा पाय कां धरलास ?"*

खेळच हा तर गमतीखातर
चालवि कातर
रक्तवाहिन्यांवरतीं, त्या शब्दांची.
त्या रक्ताच्या लोटामधुनी
वाहुन गेले
ओठावरचे शब्द कांपरे.

*"चोरलास कां माझ्या उरिंचा स्वप्नचंद्रमा ?"*

पुढतीं त्यानें
विचारलें का कांहीं

फसून त्याला
हात बिलगले, कीं नाहीं
हें असलें कांहीं
घडलें का, कीं नाहीं...

रक्तमाखल्या मिठींतलीं पण
उरलीं क्षितिजें;
अजून ज्यांनीं धरुन ठेविलें
धुकें स्मृतीचें.

## स्वप्न तुझें

उशागतीच्या, ह्या खिडकीच्या
उंच गजांच्या मागें
अडव्या तिरप्या
कडुनिंबाच्या फांद्या.

त्यांच्यामागें
मावळतीचा लाल चंद्रमा.

त्याच्यामागें
धुकट निळें आभाळ मोकळें.

त्याच्यामागें ... स्वप्न तुझें.

स्वप्न तुझें. वाट पाहतें
नीजबंद डोळ्यांची ;
रेशिमकाळ्या डोहावरची
लहर एकही विरावयाची
मी बुडल्यावर.

आणिक नंतर
उडी घेत तें चंद्रावरतीं ;

धरुनी अलगद चंद्राचा कर
येतें उतरून
धरणीवरतीं ;

धरणीवरचें त्याचें पहिलें पाउल
पडतें
वीजदाटल्या कडुनिंबाच्या
फुलघोसांवर ;

घेत गजांची मानवंदना
येतें उशागतीला.
उभें राहतें स्तब्ध, अनामिक,
श्वास रोधुनी.

येतें जेव्हां डोहांतुन मी वरतीं
घुसमटलेली—निथळत पाणी,
उशागतीला बघतें
शुभ्र धुक्याच्या चार पाकळ्या
दंवभिजलेल्या.
धगधगतो अन् गंध तयांचा
हृदयामधल्या दहा दिशांतुन.

## डोळां रेखलें काजळ

डोळां रेखलें काजळ
दिलें नीट विजेपाशीं;
तुरे खोविले केसांत
दिले लाल मातीपाशीं.

सुखावली वादळांत
तुझ्या स्पर्शाची जाणीव;
मृगजळाच्या तळाशीं
तुझ्या प्रीतीचा आठव.

जातांनाची देवघेव...
निरविल्या अशा राशी;
जाणें आहे एक, एक
निळी नग्न ज्वाला जशी.

तुझ्या दु:खाचे समुद्र
कधीं झेलले मीं सात;
तेच घेतें सोबतीला...
एक अश्रू पापणींत.

## उरली केवळ

अशिच कधीं मी रमलें होतें
तुडुंबलेल्या चंद्रामध्यें,
चंद्रावरुनी तरंगणाऱ्या
इवल्याइवल्या मेघांमध्यें
माझ्यामध्यें.

डिंवचुन गेलें तोंच कुणी तों
क्षणैक हलली
काळी छाया
तिमिराच्या वाऱ्यावर.

तेव्हांपासुन अखंड आहें जागी.
भिरभिर डोळे
बुडे बाहुली त्या छायेमधिं.
थरथर स्पर्शाचें संवेदन
त्या स्पर्शाच्या तुकड्याभंवतीं.

## वर्षा

ढगामागें ढग
        ढग दाटले आभाळीं;
सोनतुऱ्याच्या फुलांत
        वीज भरली पिवळी.

लाल मातीच्या कणांत
        भरे उतावीळ काळी;
शीळ हिरवी वाऱ्यांत
        लावी अचूक जिव्हाळी.

तुला सामोरें येतांना
        अशी कांहीं नवी झालें;
लगबग पायखुणा
        —इंद्रधनुष्य सांडलें.

## मनोरा

झोपीं गेली भातुकली
झोपलेंही घरकूल ;
आणि मांडतें मी माझा
उंच मनोऱ्याचा खेळ :

पहिला माझा तास
तनूमनाचा शिणवट
पायथ्याला काळी वीट.

दुसरा माझा तास
लक्ष तुझ्या स्मरणांचा ;
एक एक फुललेला
तुरा मत्त पांगाऱ्याचा.

तिसरा माझा तास
माझ्या मनींच्या स्वप्नांचा ;
खेळ उन्हाचा धुक्याचा.

चवथा माझा तास
उभी मीच माझ्याविना ;

उंच उंच मनोऱ्याला
वर आभाळ दिसेना.

वर  आभाळ दिसेना
खालीं नजर पोचेना.

## पदर उन्हाचा

एक उसासा...
डहाळीवरुनी घळलीं खालीं
बकुळें ताजीं;

एक उसासा...
जळमेघांतुन सरसरले अन्
थेंब टपोरे...

एक उसासा...
कडकडला तरु—आलीं उमळुन
लालपांढरीं लाख मुळें;

एक उसासा...
पाण्यावरतीं चढल्या लाटा
आणि वाकलीं लाख अभाळें.

तुझींच हीं निःश्वसितें ;
मी तर वादळवेडी.

सरसर चढतें तुफान लाटांवरतीं.
सावरतें जळबुंदी शाल
फडफडणारा

आणि झेलतें
ताजीं बकुळें... पसरुन खालीं
पदर उन्हाचा.

## आज

रोज रोज आभाळांत
चंद्रचांदण्यांचा चुरा ;
आज त्यांच्या तेजामध्यें
कुणीं ओतला केवडा.

वळचणीची मैनाराणी
रोज रोज घाली शीळ ;
आज पहाटे तिची कां
झाली सनई मंजूळ.

घड्याळाची रुक्ष घाई
सेकंदांत मिनिटांत ;
कुणीं ओविलीं हीं फुलें
आज वाटेच्या ओढींत.

## उभें मात्र थेंब रक्त

हरखून पहावें तों
  रात्र उतरे डोळ्यांत;
लाख स्मृतींची टांचणी
  भिजे चांदणीविषांत.

बोलावा तों शब्द कांहीं
  क्षितीजाचे व्हावे ओठ;
त्यांना जखम मौनाची ...
  उभें मात्र थेंब रक्त.

# नटरंगी

सफ्फरचंदाच्या रंगांतुन
असेंच अवचित रांगत आलें;
लाल उकलल्या पेरूमधुनी
बघून तिजला खुदकन् हसलें;

टपोर द्राक्षांच्या घोसांतुन
बिलगे तिजला झेप टाकुनी;
फुटलीं द्राक्षें कायेवरतीं
गेली अवघी मग बावरुनी.

—लपवूं कोठें मुळीं कळेना
नटरंगी हा अवखळ कान्हा.

## समोर उरतें

समोर उरतें नुसतें
क्षितिजच जेव्हां,
वळून बघतें मागें
उंबरठ्यांतुन :

बघत राहतें...

बघतें शिसवी टेबल;
फडफडणारें उघडें पुस्तक;
तबक चहाचें
तिरकस खुर्ची.

बघत राहतें...पीत राहतें
अमृतडंख निराळा
उरे तोंवरी
निव्वळ चोथा.
शिसव्याचा...काचेचा...
निव्वळ वस्तुपणाचा.

## कणव

खालीं थंडगार भुई
वर जुलुमी कौलार;
चारी बाजूंनीं वेढती
उंच उंच भिंती चार.

जन्माचा हा कारावास
कधीं संपेल कळेना;
श्रांत मिटल्या लोचना
दीस...रात्र उमगेना.

—लाख योजनें मापावीं
बारा फुटांच्या खोलींत;
उभें आभाळ पहावें
दीड फुटाच्या बारींत;

कौलांतील छिद्र दावी
ऊनसावलीचा खेळ;
वास्तू दावून कणव
पाडी जिवा मुका पीळ!

## उदाच्या बनांत

कितीं युगांनीं आलें पुन्हां...
बनांत...उदाच्या.

झाकळलेल्या हवेंत होता
ओला गंध उदाचा;
पाउस होता जरा थांबला.
अजुन तरीहि
निथळत होतें पाणी
पानांवरुन उदांच्या...
संथ लयीवर
टप्...टप्...टप्...टप्.

किती युगांनीं, फिरलें पुन्हां
ऊदबनांतुन...

समोरचें तें झाड उदाचें;
अवचित झाली त्यावर
शुभ्र उन्हाची शिंपण.
उभी राहिली
अरास हिरवीपिवळी
चमचमणाऱ्या गवतावरतीं.

गवतावरतीं . . . दोन सावल्या.

मधल्या अडव्या
फांदीवरतीं रेलुन
दोन सावल्या—
तो होता खोवित घोस फुलांचा
सावलींतल्या अंबाड्यावर.

समोर
इकडे . . . तिकडे . . . कुठेंच
नव्हतें कोणी.

उरांत झालें धस्स . . .
आणखी
धडपडलें मी परत फिराया . . .

झगझगला पण दिवा विजेचा
मच्छरदाणीच्या जाळींतुन.

इथेंच होतें मी तर . . .

श्वास टाकला एक सुखाचा.
सहज फिरविला
केसांवरुनी हात . . .

हात गोठला
वेणीमधल्या फुलघोसांवर.

दुज्या करानें... घट्ट खेंचला
काळोखाचा पडदा,
लपावयाला लपलेल्यांच्यापासुन...

# तूं

कधीं, दुष्ट तूं असा... कोरसी
दंवबिंदूवर अभाळनक्षी ;
मातीच्या कधिं ओंजळींत पण
लपसी येउन... जखमी पक्षी.

कधीं, असा तूं गरिब समंजस
गुणी लेकरूं कुशींत घ्यावें ;
हात कधीं स्वर्गंगेचे तरि
तुझ्या गळ्याला ते न पुरावे.

अन्वयार्थ लावतां तुझा हा
दूर... खोलवर बघती डोळे ;
अर्थावाचुन उरे गहन तें—
त्याच्यास्तव हे ओठ भुकेले.

# भिल्लीण

उघड्या खिडकींतून येतसे
भिंतीवर चौकोनचांदणी,
उभ्या गजांच्या मागें झुलते
फांदी काळीशार देखणी.

कधीं मणिपुरी, आतुर राधा
उभी राहते धरुन गजाला;
कधीं कथाकलि, गभीर, अडवे
मुद्रा जुळत्या संथ लयीला.

जलद लयीवर घेते, कथ्थक;
कधीं जातसे तोल असा तर
घाबरतें मी...ती पण सुस्थिर,
चुके न ठेका, चुके न घुंगुर.

रंगरंगतो रंगमंच अन्
कशी न कळते रात्र उलटते,
कशी आणि भिल्लीण पार्वती
हिमालयासह वितळुन जाते.

## पावसाची रात्र

पावसाची एक रात्र
—थंडगार काळी पाल—
आभाळाच्या छतावरी
बसे सावध...निश्चल;

पावसाची एक रात्र
होते विद्रूप बेडकी;
वादळाच्या पाण्यामधें
फुगे...ओरडे सारखी;

पावसाची एक रात्र
येते होऊन नागीण;
उतरते...वळा...वळा
माती डंखावी म्हणून;

पावसाची एक रात्र
येते होऊन माणूस;
डोळे पुसत आपुले
पाजवीते मला वीष.

## आलें होतें सांगायाला

आलें होतें सांगायाला
गूज हिरव्या पंखाचें;
गुंजावनी डोळे तसे
लाल लाघट चोचीचें.

दिसलें कीं काय त्याला
बिंब डाळिंबी डोळ्यांत;
झालें घाबरें... घाबरें
निसटलें अवचित...

वेडें उगाच हासलें,
वेडें कांहींच बोललें...
कसें तुला सांगायाचें
माझें कांहीं हरवलें!

## अजंठा

अजंठ्याच्या कलाकाराची
विसरून राहिलेली
एक पुसट रेषा
माझ्या रक्तांतून वाहत आहे...
मी गुदमरतें
घामट सिमेंटी तटबंदींत.

पण मला माहीत आहे
एक मंत्र;
"मीट पापणी."

आणि क्षणार्धांत मी उभी राहतें
काळ्याकभिन्न गुहेच्या दाराशीं.

आज मला खोदायचें आहे
एक लाल तळें;
आणि त्याच्या कांठावर
एक प्रचंड वृक्ष,
ज्याच्यावर भास दिसावा
ध्यानस्थ बुद्धाचा.

आणखी मला कोरायचे आहेत
दोन डोळे

किंचित् लाल ; किंचित् त्रस्त ;
ज्यांतील बेगुमान पिंगट तीर
                घुसले आहेत
क्षितिजाच्या छाताडांत.

घामाचा शेवटचा थेंब
                गळेपर्यंत
रेषा उमटत असतात ;
छटा मिसळत असतात...
खोल...खालच्या दरींतील
पुलाखालच्या
नदीच्या पाण्यांत तुडुंब
डुंबतां डुंबतां...
                एकदम
उघडतात डोळे.

आणि हात मोजूं लागतात
*तीन कप पाणी*
*सहा चमचे साखर...*

## अशा भलत्या वेळीं

अशा भलत्या वेळीं
कोण कुठें निघालें आहे ?

काळोखाच्या तुफान घोड्यावर
इतके चाबूक
कोण ओढतें आहे ?
आणि वाऱ्याचीं चाकें तरी
केव्हढ्या मोठ्यानें गाजत आहेत...

—घड्याळाच्या डांबरी रस्त्यावरून
एक टांगा
सारखा फिरतो आहे ;
सारखा फिरतो आहे.

कोण कुठें निघालें आहे ?

## एक वेड

होतें मज एक वेड
वाटा काढित
निबिड वनांतुन फिरण्याचें;
वारा तोलत
डोंगरमाथा चढण्याचें...

उरलें आहे
आज फक्त तें
भिंतीवरच्या चित्रामध्यें.

होतें मज एक वेड
एकटकीनें
दरियावरचे जहाजपक्षी
बघण्याचें;
लाटांवर झुलण्याचें...

उरलें आहे
आज फक्त तें
आठवणीच्या काचेमध्यें.

आज मला एक वेड
अंधाराचें...

मिटून स्वप्नें
अंधाराचा होउन ठिपका
अंधारांतच
विरण्याचें.

## बाधा जडली आभाळाला

बाधा जडली आभाळाला.
घुमूं लागलें
घुमवित घुमवित लाख घागरी;
बघूं लागलें वाकुन वाकुन
गवतावरच्या थेंबामध्यें;
फरफटलेंही
उलटेंसुलटें जळलहरींच्या मागुन;
टिपूं लागलें
ओठ लावुनी मातीचे कण.

आवरूं बघतें त्याला
दोन करांनीं बांधुन,
आवरूं बघतें त्याला
डोळ्यांमध्यें कोंडुन.

व्यर्थच तें पण....

जातें निसटुन
काजळावरी गढूळ टेवुन छाया,
मुठींत ठेवुन फक्त निळी धग.

मराठी ग्रंथ सं. ग्रं. नवी. मुंबई
अनुक्रमांक २३०४४
७३५४ वि. ता. ०५
नों. दि. २०/३/५४

## पारावरतीं

पाउलओढ अनावर
नेते मजला नकळत
तिन्हिसांजेच्या पारापाशीं.

कळलें नाहीं
चढलें केव्हां पारावरतीं
गिळले केव्हां पाय तयानें
खिळली केव्हां दृष्टि
क्षितिजापाशीं.

कळलें नाहीं
ओघळणारीं सुजाण पानें
पारंबीचे हात अनुभवी
करीत होते मजला सावध.

नव्हतें माझी मीच राहिलें.

अवघड वेळीं
कोण वाजवी घंटा
मध्यरात्रिच्या घुमटामध्यें.

आलीं . . . घणघणवलयें
यमुना होउन पाराभवतीं.

अंगांगावर फुटल्या फांद्या ;
फांदीफांदीवरी बहरले
घोस फुलांचे
आतुर कातर क्षितिजमुखीसे
लाखलाख ... डोळ्यांचे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 230.88 वि: 3/84
क्रमांक 93८५ नों: दि: 20/3/86

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४०८
संदर्भ शाखा (स्थल प्रत)

REFBK-0009409
REFBK-0009409